**एकूण कामापैकी ५६ टक्के काम लागले मार्गी : मान्सून दरम्यानही कामाचा वेग कायम**

# मेट्रो-३ प्रकल्पाचे काम सुसाट; ८३ टक्के भुयारीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : देशभरात कुतूहलाचा विषय ठरलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३च्या कामाने सुरुवातीपासून पकडलेला वेग आजही कायम आहे. सद्यस्थितीमध्ये मेट्रो-३च्या भुयारीकरणासह उर्वरित काम वेगाने सुरु असून, आतापर्यंत भुयारीकरणाचे काम ८३ टक्के झाले आहे. तर प्रकल्पाच्या एकूण कामांपैकी ५६ टक्के काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुंबई शहर आणि उपनगरात कोसळत असलेल्या मान्सून दरम्यानही मेट्रो-३च्या कामाला ब्रेक लागलेला नाही.

**मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, मेट्रो-३ ही वांद्रे-कुर्ला संकुलात मेट्रो २-बला जोडली जाईल. याव्यतिरिक्त चर्चगेट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक, महालक्ष्मी येथील मोनोरेल स्थानक, मेट्रो-१ला मरोळ, मेट्रो-६ला आरे येथे मेट्रो-३ जोडली जाईल. तसेच विमानतळाशीही मेट्रो-३ कनेक्ट असेल.**

मुंबईच्या रेल्वेतून सुमारे ७५ लाख प्रवाशांना रोजचा प्रवास करावा लागतो. ३३.५ कि.मी. लांबीचा हा मेट्रो मार्ग उपनगरीय रेल्वेमधील गर्दी कमी करु शकतो. मुंबई मेट्रो-३ प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रहदारीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येईल. मुंबई मेट्रो-३ प्रकल्पामुळे सुमारे १६ लाख रेल्वे प्रवाशांना वातानुकूलित डब्यातून प्रवास करणे शक्य होईल. प्रवासाच्या वेळेत घट, ध्वनी व हवेच्या प्रदुषणात घट, सुरक्षित व आरामदायी प्रवास अशा अनेक सोयीसुविधा उपलब्ध होतील. संपूर्णपणे भुयारी मेट्रो मार्गावर २७ स्थानके असतील. पाच स्थानके उपनगरीय रेल्वेशी अदलाबदल करण्यासाठी असतील. भुयारी प्रकल्पाची बांधणी करताना अस्तित्वात असलेल्या इमारतींचे संरक्षण होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात येत आहे, असा दावाही एमएमआरसीने केला आहे.

सचिन लुंगसे



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३च्या स्थानक उभारणीचे काम करताना कामगार.



### जपानमधून आले रुळ

- या भुयारी मार्गावर धावणाऱ्या मेट्रोचे रुळ मुंबईत आले असून, हा रुळांचा संच जपानमधील यावाटा येथून ४ आठवड्यांच्या कालावधीत सागरी मार्गाने मुंबईत आणण्यात आला होता.
- मेट्रो धावत असताना कमीत कमी कंपने आणि ध्वनी निर्माण करणे हेही या यंत्रणेचे वैशिष्ट्य आहे. मुंबईतील प्राचीन वास्तूंना इजा पोहोचणार नाही या दृष्टीने ही यंत्रणा उपयुक्त आहे.



- **मेट्रो ३ प्रकल्पात कार्यरत कामगारांची योग्य ती काळजी घेतली जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.**

## मेट्रो-७ : लिफ्ट सामग्री दाखल

**१** मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व या मेट्रो-७चे काम करण्यात येत असून, बुधवारी रात्री मेट्रो-७साठीच्या ४ लिफ्टची सामग्री मुंबईत दाखल झाल्याची माहिती प्राधिकरणाकडून देण्यात आली.

**२** मुंबई बंदरावर दाखल झालेली ही सामग्री मागाठाणेसह उर्वरित ठिकाणीही वापरली जाईल. ५७ लिफ्टपैकी ४ बाणडोंगरी, आरे, पठाणवाडी आणि मागाठाणे येथे प्रत्येकी दोन आहेत.

**३** सहा बंदरात आहेत. २८ जूनपर्यंत २१ दाखल होणार आहेत. १८चे काम सुरु असून, त्या जुलैमध्ये मुंबईत दाखल होतील, अशी माहिती प्राधिकरणाकडून देण्यात आली.